# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/१८८४/२०१७

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेद्रांचे समन्वयक/संचालक आपल्या सर्वांच्या पुन्हा निदर्शनास आणुन देण्यात येते की, ज्या अभ्यासक्रमाचे परीक्षा (एप्रिल/मे, २०१७ मध्ये घेतलेल्या) प्रवेश अर्ज MKCL या प्राधिकरणामार्फत DU पोर्टल वरून Online स्विकारण्यात आलेले आहेत; या सर्व अभ्यासक्रमांसाठीच्या सत्र १ ते ४ चे SGPA अद्यापही संबंधीतांकडून परिपूर्णरित्या प्राप्त नाहीत.

तरी याबाबतीत सर्व संबंधीतांना पुन:श्च कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांकडून DU पोर्टलवर SGPA भरणे बाकी राहून गेलले आहेत; त्यांनी हा तपशील दि. १५ जुलै, २०१७ पर्यत MKCL या प्राधिकरणाने उपलब्ध करून दिलेल्या वेब लिंकवर ऑनलाईन भरावा व या भरलेला तपशीलाची System Generated Copy दि. १७ जुलै, २०१७ विद्यापीठात हस्तेपोच सादर करावीत.

**उक्त नमुद केलेल्या मुदतीत उपरोक्त प्रमाणेचा तपशील प्राप्त न झाल्यास संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील व या संदर्भात पुढे काही बाब उद्‌भवल्यास यास संबंधित महाविद्यालयास सर्वस्वी जबाबदार धरून अशा महाविद्यालयांवर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.**

तसेच पुढे असे की, उपरोक्त प्रमाणेचा तपशील भरताना आपणांस काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास खालील नमुद असलेल्या दुरध्वनी क्रमांकावर व ई–मेल वर आपण संपर्क करू शकतात

दुरध्वनी क्र. :– ०२२ २६५ ३३०५८

ई–मेल :– dumumbai@mkcl.org

उपरोक्त सर्व बाबींची संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी व निकाल जाहिर करण्याच्या प्रक्रियेस सहकार्य करावे ही विनंती.

(To update pending lower exam. entry go through following path :-

college login ⟶ Examination ⟶ Post Examination ⟶ Results ⟶ Edit Result Status )

मुंबई – ४०००९८
दि. ३ जुलै, २०१७.

(दीपक वसावे)
स्था. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

अ. प्रत:–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वयक/संचालक

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:–

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग